


दैनिक


# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार 28 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 280 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# निवडणूकीनंतरचा पहिलाच अर्थसंकल्प: कोणतीही करवाढ नाही, सर्वसमावेशक विकासाचा परळीकरांना दिला विश्वास!

## परळी नगरपरिषदेचे 2026-27 अर्थिक वर्षासाठी 293 कोटींचे 'शिलकी अंदाजपत्रक' सादर



**परळी वैजनाथ, (प्रतिनिधी)**

परळी नगरपरिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा २९३ कोटी ३० लाख ३३ हजार ७५३ रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभागृहात सादर केला. करवाढ किंवा दरवाढ न करता विकासकामांना गती देणारा हा 'विकासनामा' असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नगरपरिषद निवडणूकीनंतरचा सत्ताधारी महायुतीच्या वतीने सादर करण्यात आलेला हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. कोणतीही करवाढ किंवा दरवाढ नाही.परळीच्या सर्वसमावेशक विकासाचा संकल्प या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून सादर करून नगरपरिषदेने परळीकरांना नव्या दिशेच्या विकासात्मक वाटचालीचा विश्वास दिला आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषदेच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्यानंतर महायुतीने नगर परिषदेच्या माध्यमातून परळी शहराच्या चौफेर विकासाचा ध्यास घेतलेला आहे. निवडणुकीनंतर नवीन नियमक मंडळाच्या वतीने पहिलेच अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. न.प. सभागृहात आज (दि.27) झालेल्या अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सन 2026- 27 या वर्षासाठी चा अंदाजपत्रक आराखडा सभागृहात मांडला. परळीकर नागरिकांना दिलासादायक अशा प्रकारचे हे अंदाजपत्रक असून करवाढ मुक्त परंतु विकासयुक्त अंदाजपत्रक असे या आराखड्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. पायाभूत सुविधा आणि सर्व समावेशक विकासाला प्राधान्य देण्याचे अभिवचन या अंदाजपत्रकातून देण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियमाच्या चौकटीत राहून तयार करण्यात आलेला हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा मेळ नसून परळीच्या उज्वल भविष्याचा आराखडा आहे. आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि प्रत्येक पैशाचा जनहितासाठी विनियोग या तत्त्वांवर आधारित नियोजन करण्यात आले आहे.

### सन २०२६-२७ साठी मांडण्यात आलेल्या अंदाजपत्रकाचा तपशील...

परळी नगर परिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा २९३ कोटी ३० लाख ३३ हजार ७५३ रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. यामध्ये नगरपरिषदेचे नगरपालिका दर व कर,विशेष अधिनियमाखाली वसुली, नगरपरिषद मालमत्ता उत्पन्न , अनुदाने व अंशदाने, संकीर्ण उत्पन्न , असाधारण संकीर्ण जमा यामधून होणारे एकूण अपेक्षित उत्पन्न (मागील शिलकीसह) २९३.३० कोटी रुपये इतके अपेक्षित धरण्यात आले आहे. तर साफसफाई विभाग , आरोग्य व पाणीपुरवठा, रस्त्यांवरील विद्युत व्यवस्था, भालचंद्र वाचनालय व इतर वाचनालये असा मुख्य खर्चाच्या तरतुदी नुसार एकूण नियोजित खर्च २९२ कोटी ९५ लाख १४ हजार ८२० रुपये इतका होणार असून अंदाजे ३५ लाख १८ हजार ९३३ रुपयांची शिल्लक अपेक्षित धरण्यात आली आहे. याशिवाय शासनाच्या विविध योजनांतून रस्ते, सभागृहे, नाली बांधकाम, ढापे, शासकीय इमारती, नगरोत्थान योजना, अल्पसंख्यांक योजना, विशेष व वैशिष्ट्यपूर्ण योजना यांअंतर्गत दुरुस्ती व विकास कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### पंचसूत्री विकासावर भर

शहर विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा,दर्जेदार रस्ते, दिवाबत्ती व्यवस्था, उत्तम आरोग्य या पंचसूत्रीवर आधारित नियोजन करण्यात आले असून "स्वच्छ- सुंदर- हरित परळी" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. हा अर्थसंकल्प कोणत्याही एका प्रभागापुरता मर्यादित नसून सर्व प्रभागांत समतोल निधी वाटपाचे धोरण राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. नगरपरिषदेच्या उत्पन्नातील मोठा वाटा शासकीय अनुदानांचा असून, करवसुली व मालमत्ता उत्पन्नातून विकासनिधी उभारला जाणार आहे.

### शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राजकारणापलीकडे जाऊन सहकार्याचे नगराध्यक्षांचे आवाहन

**दरम्यान, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी आपल्या कारकिर्दीतील पहिलाच अर्थसंकल्प आज सादर केला. परळीकर जनतेने आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ करून दाखविण्यासाठी नगरपालिकेच्या एक ना एक रुपयाचा विनियोग जनकल्याणासाठीच व्हावा असा आपला निर्धार आणि संकल्प असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आजचा हा अर्थसंकल्प एक पाऊल विकासाकडे आणि एक पाऊल विश्वासाकडे नेणारा आहे. सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून शहराच्या प्रगतीसाठी सकारात्मक साथ द्यावी असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभागृहात केले.सर्वांच्या सहकार्याने परळी नगरपरिषद अधिक सक्षम, समृद्ध व महाराष्ट्रात अव्वल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या अर्थसंकल्पीय सभेला उपनगराध्यक्ष सर्व समित्यांचे सभापती व नगरपरिषदेचे सन्माननीय सदस्य, सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## मोदी–शहा यांचा माझ्याविरोधात कट : अरविंद केजरीवाल यांचा गंभीर आरोप

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

कथित मद्यधोरण प्रकरणात न्यायालयाकडून दिलासा मिळाल्यानंतर दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. "मोदी आणि शहा यांनी माझ्याविरोधात कटकारस्थान रचले होते. माझी राजकीय कारकीर्द संपवण्याचा प्रयत्न झाला," असा गंभीर आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

केजरीवाल म्हणाले, "हिम्मत असेल तर मोदींनी दिल्लीमध्ये आता निवडणूक घ्यावी. भाजपने १० पेक्षा जास्त जागा जिंकल्या तर मी राजकारण सोडेन." गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने मद्यधोरण प्रकरणावरून 'आप'वर जोरदार प्रचार केला होता. या पार्श्वभूमीवर केजरीवाल यांचे वक्तव्य राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहे.

दरम्यान, भाजपकडूनही प्रत्युत्तर देण्यात आले. भाजप नेते सुधांशू त्रिवेदी यांनी म्हटले की, "केजरीवाल यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी ही केवळ तांत्रिक बाब आहे. न्यायालयीन लढाई अद्याप संपलेली नाही. सीबीआयचे आरोप गंभीर आहेत आणि त्यांची चौकशी सुरूच राहील." निवडणूक पराभवानंतर केजरीवाल काही काळ सार्वजनिक जीवनातून दूर राहिल्याचा आरोपही करण्यात आला होता. यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी स्पष्ट केले, "मी राजकारणी नाही, मी एक प्रामाणिक माणूस आहे. सत्य बाहेर येईल, तेव्हा मी अधिक ठामपणे बोलणार." दिल्लीच्या राजकारणात या आरोप-प्रत्यारोपांमुळे पुन्हा एकदा वातावरण तापले असून, आगामी राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे



# जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीज निमित्त आज शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आयोजन

## सुप्रसिद्ध अभिनेते,विचारवंत किरण माने यांच्या हस्ते उदघाटन तर प्रमुख पाहुणे कामगार नेते डि.एल.कराड मयांक गांधी,पत्रकार विलास बडे,पैगंबर शेख,स्वप्नील चौधरी,अजित अभ्यंकर राहणार यांचा होणार परिसंवाद

**सिरसाळा : प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज निमित्त २५ गावच्या सहकार्यातून धारुर तालुक्यातील कान्नापूर येथे भव्य सात दिवसीय शेतकरी कीर्तन महोत्सवाचे आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजन करण्यात आले आहे. तुकाराम महाराज बीज निमित्त शेतकरी कीर्तनात समता आणि सलोख्याचा संदेश संबंध मानवतेला दिला जाणार आहे.

जात्यंधता, धर्मांधता आणि अंधश्रद्धेच्या वणवा सर्वत्र पेटलेला पहायला मिळत असताना या वणव्यात ही भक्तीसोबतच, शेती आणि बळीराजाचा जागर करणारा, संत विचाराच्या वर्षावाने प्रेमाचा गारवा निर्माण करण्याचे कामकरणारा गाव समूहाचा शेतकरी कीर्तन महोत्सव शनिवार दि २८ रोजी आरंभ होत असून या अभिनव प्रबोधनात्मक कीर्तन महोत्सवात सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, सामाजिक कार्यकर्ते मयांक गांधी, पत्रकार विलास बडे, सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख,



प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

संत विचारातून सामाजिक सलोखा निर्माण करत संत तुकाराम महाराज यांनी समाजातील दांभिकतेवर प्रहार करत धर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या पाखंडाचे खडंण केले याच वैज्ञानिक विचारसरणीचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी, समाजातील अंधश्रद्धा दूर करून शेती आणि बळीराजा याच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी मागील ३ वर्षांपासून धारूर, परळी तालुक्यातील २५ पेक्षा अधिक गावातील शेतकरी, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने तुकाराम बीजोत्सव मोठा थाटात साजरा करण्यात येत असतो. यावर्षी

शनिवार दि २८ रोजी आरंभ होत असून या सोहळ्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते आणि समाजभान असणारे सामाजिक कार्यकर्ते किरण माने, कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत महाराज जाधव, जागतिक कीर्तीचे मृदंग वादक उद्धव बापू आपेगावकर यांची उपस्थिती असणार आहेत. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन मांडणारे, प्रसंगी कमरे इतक्या पाण्यात उतरून वस्तुस्थिती जगासमोर आणणारे पत्रकार विलास बडे, विविध प्रयोगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणारे मयांक गांधी, शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नावर थेट भूमिका घेणारे पैगंबर शेख, सुप्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी, जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. अजित अभ्यंकर यांची यावर्षी व्याख्याने होणार आहेत. मधुकर महाराज बारूळकर, अविनाश महाराज भारती, जनक महाराज सोळंके, गणपत महाराज पवार, एकनाथ महाराज माने , ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांची कीर्तने होणार आहेत, तर शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याचे किर्तनाने या कीर्तन महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी भगवान बडे बालाजी कडभाने प्रकाश उजगरे आबा कांबळे मदन वाघमारे उपस्थित होते.

# डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या माहितीपत्रकाचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते विमोचन

### वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी नागरिकांनी डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे सभासद व्हावे – शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे

### नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचा उपक्रम ; डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय माहितीपत्रकाचे प्रकाशन

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घालणाऱ्या डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची अत्याधुनिक नूतन इमारत भव्य आणि सुसज्ज वास्तूमुळे परळी वैजनाथ शहराला आधुनिक ज्ञानमंदिराचे सुरु झाले आहे. डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय सर्वांसाठी पुस्तके व विविध शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देत ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला आणि वैयक्तिक विकासाला बळकटी देते आहे. डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या माहितीपत्रकाचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्याहस्ते विमोचन करण्यात आले. नगर परिषद शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचा सभासद नोंदणीसाठी स्तुत्य उपक्रम आहे. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी नागरिकांनी डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे सभासद नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांनी केले आहे.



राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगर परिषद सभागृहात नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व उपनगराध्यक्ष पठाण खैसर राजाखान सर्व समित्यांचे सभापती व नगरपरिषदेचे सन्माननीय नगरसेवक व नगरसेविका यांच्या उपस्थितीत डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या माहितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

१२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घालणाऱ्या डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची अत्याधुनिक नूतन इमारत भव्य आणि सुसज्ज वास्तूमुळे परळी वैजनाथ शहराला आधुनिक ज्ञानमंदिराचे लोकार्पण पार पडले. पिढ्यानपिढ्या जिज्ञासू मनांना पोषण देण्यात ग्रंथालयांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संकलन नसून ते एक सशक्त ज्ञानकेंद्र आहे. सर्वांसाठी पुस्तके व विविध शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देत ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला आणि वैयक्तिक विकासाला बळकटी देते. शांत, अभ्यासपूर्ण वातावरण आणि साहित्याची समृद्ध विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. डिजिटल युगात ऑनलाईन वाचन करताना अनेक व्यत्यय येतात, ज्यामुळे एकाग्रता आणि ज्ञानवृद्धी बाधित होते. यावर प्रभावी उपाय म्हणजे सुसज्ज वाचनालय. आपण सर्वांनी आपल्या सर्वांगीण विकासासाठी या वाचनालयाचा लाभ घ्यावा, स्वतः समृद्ध व्हावे आणि समाजालाही समृद्ध करावे. वाचनालयाला भेट देऊन सभासद व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची वैशिष्ट्ये तब्बल ४५,००० हून अधिक पुस्तके एकाच ठिकाणी उपलब्ध., विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका (मुला-मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था), स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र., कलादालन, बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्र, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) कक्ष, दुपारच्या जेवणासाठी पॅन्ट्री व्यवस्था, फिल्टर पाणी, वीज, स्वच्छतागृह, पार्किंग आदी मूलभूत सुविधा, अनुभवी ग्रंथपाल व सहयोगी कर्मचारी, सुसज्ज पुस्तकांची मांडणी यासह अनेक सोयीसुविधायुक्त वाचनालय मिळणार आहेत.

डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयात वर्षानुवर्षे या ग्रंथालयामध्ये हजारो संख्येने शालेय विद्यार्थी, एमपीएससी, यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी तसेच पत्रकार, राजकीय, वकील, शासकीय अधिकारी, कर्मचारी व जेष्ठ नागरिक सभासद आहेत. वाचन संस्कृती जपण्याबरोबरच विचारांच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती सर्व दालने एकाच ठिकाणी आहेत. परळी शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा आणि नागरिकांना दर्जेदार व अत्याधुनिक अशा प्रकारचे वाचनालय परळीत उभे राहिले आहे. वाचन संस्कृती आणि अत्याधुनिक साधनांची जोड या ठिकाणी देऊन सुसज्ज वाचनालय नागरिकांच्या सेवेत दाखल झाले आहे.शहराच्या जडणघडणीत सुशिक्षित समाजाचा वाटा अत्यंत मोठा असतो. वाचन संस्कृती रुजणे ही काळाची गरज आहे. वाचाल तर वाचाल हा विचार केवळ शब्दांपुरता न ठेवता तो आचरणात आणू या. आपण व आपल्या पाल्यांसह मोठ्या संख्येने वाचनालयाचे सभासद व्हावे असे आवाहन नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व उपनगराध्यक्ष पठाण खैसर राजाखान, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती योगेश मेनकुदळे, मुख्यधिकारी पी. एन.निगळ, उपमुख्यधिकारी संतोष रोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शंकर साळवे ( 9309981258) गंगाधर जगतकर (9561205930) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न



## शाळेतील बालवैज्ञानिकांनी विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध प्रयोगांचे सादरीकरण केले

**परळी/(प्रतिनिधी)**

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल येथे दिनांक २० फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवी दिशा देण्यासाठी भव्य दिव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अतिथी व परीक्षक म्हणून प्राध्यापक अशोक पवार सर, (लक्ष्मीबाई देशमुख,महिला कॉलेज,परळी ), प्रा. श्री. अरुण चव्हाण सर व शाळेचे प्राचार्य मा.श्री श्रीकांत पाटील सर इतर मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर विज्ञान प्रदर्शन सर्वांसाठी खुले करण्यात आले.शाळेच्या सभागृहात विविध विभागांमध्ये मांडलेले प्रकल्प पाहण्यासाठी दिवसभर विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष मॉडेल्सच्या माध्यमातून सादर केल्या. पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मिती, पावसाच्या पाण्याचे संकलन, स्वयंचलित सिंचन व्यवस्था, स्मार्ट शहराची रचना, सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे आणि साध्या साहित्यापासून तयार केलेले रोबोटिक्स मॉडेल्स विशेष आकर्षण ठरले. काही विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्यांवर उपाय सुचवणारे उपयुक्त प्रयोगही सादर केले.

प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांमागील वैज्ञानिक तत्त्वे उपस्थितांना सोप्या भाषेत समजावून सांगितली. उपस्थित मान्यवरांनी व अनेक पालकांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे आणि सादरीकरण कौशल्याचे कौतुक केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रयोगशीलता वाढीस लागते, असे मत शाळेचे प्राचार्य मा. श्रीकांत पाटील सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले.

विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब IAS (सचिव,त्रिपुरा सरकार) यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तका पुरते शिक्षण मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी देणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. तसेच त्यांनी शाळेतील बाल वैज्ञानिकांच्या प्रयोगांचे विशेष कौतुकही केले.

हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती,विज्ञान विभागातील व शाळेतील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची आवड वाढण्याबरोबरच समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजण्यासही हातभार लागणार असल्याचे सर्व स्तरांतून मत व्यक्त होत आहे.

## मार्चच्या 'या' तारखेपासून बेस्ट बससेवेत बदल

**मुंबई :** मुंबईकरांची सेवा करणारी बेस्ट बसच्या मार्गात आणि तिच्या फेऱ्यांमध्ये मुंबईकरांच्या सोयीनुसार परिवहन मंडळाने बदल केले आहेत. प्रवाशांच्या गरजेनुसार बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि वाहतूक उपक्रमाने बससेवेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. कमी प्रवासी असलेल्या थांब्यांवरील सेवा कमी करून गर्दीच्या मार्गांवर बसच्या फेऱ्या वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय काही मार्गांवर वातानुकूलित बससेवा सुरु करण्यात येणार आहे. दक्षिण मुंबई आणि उपनगरांतील काही मार्ग व थांब्यांमध्ये फेरबदल करण्यात आले असून हे बदल १ मार्चपासून लागू होणार आहेत.

ए ६ बस आता बॅकबे आगाराऐवजी कुलाबा आगारापर्यंत धावेल. ए २२ मार्ग विजय वल्लभचौकऐवजी जिजामाता उद्यान ते मजास आगारदरम्यान चालवला जाईल. मार्ग ६९ वडाळा आगाराऐवजी शिवडीतील प्रबोधनकार ठाकरे उद्यान येथे संपेल. ए ५१५ सेवा सिप्झ गावाऐवजी सिप्झ बस स्थानकापर्यंत मर्यादित राहील. ए १ मार्गातही महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सांताक्रुझ डेपोदरम्यान धावणारी ही बस वांद्रे रिक्लेमेशन आणि वांद्रे पश्चिम बस स्थानकाचा वळसा टाळून माहीम कोळीवाडा ते वांद्रे टॉकीजदरम्यान स्वामी विवेकानंद रोडमार्गे थेट धावेल. त्यामुळे प्रवासाचा वेळ कमी होण्याची शक्यता आहे. ए १०१ मार्गाचा विस्तारही करण्यात आला आहे. सध्या सीएसएमटी ते वर्ल्ड ट्रेड सेंटरदरम्यान धावणारी ही बस आता महात्मा फुले मंडईपर्यंत जाईल. परतीचा मार्ग डॉ. डी. एन. रोड आणि हुतात्मा चौकातून असेल. यामुळे दक्षिण मुंबईतील प्रवाशांना अधिक सोय होणार आहे. याशिवाय काही मार्गांवर वातानुकूलित बससेवा सुरू केली जाणार आहे. ए २०३ (आरसी चर्च – कमला नेहरू उद्यान), ए ३२४ (शास्त्री नगर – चांदिवली बस स्थानक), ए ३२६ (अंधेरी स्थानक पश्चिम – मिल्लतनगर), ए ३४६ (अंधेरी स्थानक पश्चिम – रमेश नगर), ए ३५४ (अंधेरी स्थानक पश्चिम – वीरा देसाई मार्ग विस्तारित), ए ३८१ (माहुल गाव – कुलाबा बस स्थानक) ए ४१२ (माजगाव आगार – मुंब्रा फाटा, ठाणे) या मार्गांवर एसी बस उपलब्ध होणार आहेत. प्रशासनाने कोणताही मार्ग पूर्णपणे बंद केलेला नसून प्रवासीसंख्येनुसार फेरबदल केले.



## भारतातील विविध राज्यांत मुस्लिम अल्पसंख्याकांवरील कथित अत्याचारांविरोधात राष्ट्रपतींकडे निवेदन : पत्रकार आरेफ सिद्दिकी

**आंबेजोगाई प्रतिनिधी.**

देशातील विविध राज्यांमध्ये मुस्लिम अल्पसंख्याक समाजावर होत असलेल्या कथित अत्याचार व भेदभावपूर्ण कारवायांविरोधात कठोर पावले उचलावीत, तसेच संविधानिक हक्कांचे संरक्षण करावे, या मागणीसाठी महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पत्रकार आरेफ सिद्दिकी यांनी निवेदन सादर केला.

भारत सरकार, नवी दिल्ली यांना उद्देशून तयार करण्यात आलेले हे निवेदन माननीय जिलाधिकारी कार्यालय, बीड यांच्या मार्फत पुढे पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, काही राज्यांमध्ये धार्मिक आधारावर भेदभाव, अन्यायकारक कारवाया व सामाजिक तणाव वाढत असल्याच्या घटना समोर येत आहेत. या घटनांमुळे संबंधित समाजामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. निवेदनकर्त्यांनी केंद्र सरकारने संबंधित राज्य सरकारांकडून सविस्तर अहवाल मागवून वस्तुस्थितीची चौकशी करावी, तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य व संरक्षण दिले असून, त्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यासोबतच, अल्पसंख्याक समाजाच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवून सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी जनजागृती कार्यक्रम हाती घ्यावेत, अशी सूचना करण्यात आली आहे.

---

# वाल्मिक कराडच्या मुलाची खळबळजनक पोस्ट ; गूढ वाढले “आता मात्र सर्वांसमोर सर्व काही बोलणार” नेमके काय ?

**परळी -प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी सध्या वाल्मिक कराड न्यायालयीन कोठडीत आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांचा मुलगा सुशील कराड याने सोशल मीडियावर केलेली एक पोस्ट सध्या प्रचंड व्हायरल झाली असून, राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. सुशील कराडने आपल्या फेसबुक पोस्टमध्ये “आता मात्र सर्वांसमोर सर्व काही बोलणार” असे सूचक विधान केले आहे. या एका वाक्यामुळे अनेक तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. तो नेमकं काय बोलणार? प्रकरणात काही नवे खुलासे करणार का? की आतापर्यंत समोर न आलेल्या बाबी उघड करणार? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली होती. आरोपींना तातडीने अटक करावी, या मागणीसाठी विविध ठिकाणी आंदोलनं झाली. या प्रकरणात वाल्मिक कराड यांच्यावर गंभीर आरोप असून ते सध्या जेलमध्ये आहेत.

अशातच त्यांच्या मुलाची ही पोस्ट समोर आल्याने प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सुशील कराड याने अद्याप या पोस्टबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र त्याच्या या विधानामुळे राजकीय आणि सामाजिक पातळीवर खळबळ उडाली असून, पुढील काही दिवसांत तो काय भूमिका मांडतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रकरणातील तपास यंत्रणा आपले काम करत असताना, या नव्या सोशल मीडिया पोस्टमुळे गूढ वाढले आहे.






दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# चांदापुर येथे 7 मार्च शनिवार रोजी 12 व्या धम्म परिषदेचे आयोजन
## धम्म उपासकांनी सहभागी व्हावे : तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण यांचे आवाहन

**परळी (प्रतिनिधी)**

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा - क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी बाराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या धम्म परिषदेचे उद्घाटन अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या हस्ते होत असलेल्या धम्म परिषदेत तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपिनेस चॅनल, छत्रपती संभाजीनगर), पुज्य भिक्खू महाविरो (काळेगाव, अहमदपुर), पुज्य भिक्खू पय्यानंद (लातूर) पुज्य भिक्खू धम्मशील (हिंगोली, बीड) आणि पुज्य भिक्खू धम्मसार (किल्लारी) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त उपासकांनी लाभ घ्यावा असे आवाहन धम्म परिषदेचे कार्यवाह ॲड.अनंतराव जगतकर यांनी केले आहे.

तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण, चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे बाराव्या बौद्ध धम्म परिषदेत प्रारंभी सकाळी ९ वाजता पंचरंगी धम्म ध्वजारोहण होईल. तर परिषदेची सुरूवात सकाळी ११ वाजता होईल. या परिषदेस भिक्खु करूणानंद महाथेरो, पु.भिक्खु महावीरो, पु.भिक्खु पय्यानंद, पु.भिक्खु धम्मशील, पु.भिक्खु धम्मसार यांचे बहुमोल धम्ममार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या प्रवचनातून धम्म, समता, बंधुता आणि करूणेचा संदेश समाजात अधिक दृढ होणार आहे. या धम्म परिषदेत ना.संजय सिरसाट (मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्रालय, मुंबई.), आमदार धनंजय मुंडे (परळी विधानसभा मतदारसंघ), ना.संजय बनसोडे (मंत्री तथा आमदार, उदगीर विधानसभा मतदारसंघ), संजय दौंड (माजी विधान परिषद सदस्य), ॲड.अनंतराव जगतकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तर यावेळी डी.आर. नरसिंगे (लातूर), सतिश बनसोडे सह.दुय्यम निबंधक, सेलू परभणी), डॉ.डी.टी.गायकवाड (पुणे), ले.कर्नल डॉ.एम.एच.कांबळे (अंबाजोगाई), डॉ.राजेश इंगोले (सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ), संग्राम गित्ते (सरपंच, चांदापूर), सौ.शाहू विजय राठोड (सरपंच, वसंतनगर तांडा), प्रा.डॉ मधुकर खळगे (प्राचार्य, कृषी महाविद्यालय), आनंद तुपसमुद्रे (बौद्धाचार्य, परळी वै.), मिलिंद नरबागे (परळी वै.), श्रावण बनसोडे (बोधेगाव), महादेव बनसोडे (नागापूर), आनंद वाघमारे (समाजभूषण, पट्टीवडगाव), प्रशांत गित्ते (चांदापूर), सुरेश मिसाळ (घाटनांदूर), संतोष रोडे (उपमुख्याधिकारी, न.प.परळी वै.) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती परिषदेला लाभणार आहे. या प्रसंगी सरोजाताई गौतम डावरे, अर्चनाताई महेंद्र रोडे, नितीन नामदेव रोडे, महादेव नागनाथ रोडे, कविताताई अनंत इंगळे, कार्तिक भाऊसाहेब कांबळे तसेच परळी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक - नगरसेविका यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. ज्या उपासकांना धम्म परीषदेला उपस्थित रहावयाचे आहे. त्या धम्म उपासकांनी पांढरे वस्त्र परिधान करूनच धम्म परिषदेत सहभागी व्हावे तसेच वसंतनगर तांडा, चांदापूर (ता. परळी वैजेनाथ) या ठिकाणी धम्म परिषदेस येताना पुस - नंदागौळ - वसंतनगर तांडा ते बौद्ध विहार व परळी वैजनाथ - वसंतनगर तांडा ते बौद्ध विहार मार्गेच यावे. असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.,जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा. प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, प्रा.डॉ.विनोद जगतकर, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे, दत्ता सरवदे, निलकांत हजारे, अर्जुन काळे, प्रा. बालाजी जगतकर, सचिन रणखांबे, व्यंकट वाघमारे, डॉ.बबन मस्के, मनिषा पांडुरंग पाखरे, समाधान तरकसे, चंद्रकांत बनसोडे, सुभाष ताटे, प्रज्ञा इंगोले, वर्षा गायकवाड, मंजुश्री मधुकर कांबळे, राजीव हजारे, पंकज भटकर, मिलिंद शिंदे, सुभाष वाघमारे, राज जगतकर आकाश वेडे हे प्रयत्न करीत आहेत. बारावी बौद्ध धम्म परिषद ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक जागृती, समता आणि बौद्ध धम्माच्या तत्वज्ञानाचा प्रसार करणारा प्रेरणादायी सोहळा ठरणार आहे. ही बौद्ध धम्म परिषद अत्यंत भव्य आणि प्रेरणादायी स्वरूपात आयोजित करण्यात आलेली आहे. संपूर्ण परिसर धम्ममय वातावरणाने नटणार असून हजारो धम्मप्रेमी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तरी या ऐतिहासिक बौध्द धम्म परिषदेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास या विभागातील बौद्ध उपासकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.


पु. डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो,पुर्णा (कार्याध्यक्ष, अ.भा.भिक्खू संघ)
भिक्खू करुणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपीनेस चॅनल छ.संभाजीनगर)
पु. भिक्खु महावीरो, काळेगाव,अहमदपूर
पु. भिक्खु पय्यानंद लातूर
पु. भिक्खु धम्मशील, हिंगोली/बीड
पु.भिक्खू धम्मसार किल्लारी

# ज्ञान, प्रज्ञा आणि संस्कारांचे धम्ममेरू: प्रा. विलास रोडे

शिक्षण ही केवळ रोजगाराची संधी नसून ती मानवी मनाच्या मशागतीची प्रक्रिया आहे, हे आपल्या कृतीतून सिद्ध करणारे एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. विलास रोडे. ४ फेब्रुवारी १९६८ रोजी जन्मलेला हा प्रवास आज २८ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मिलिंद कनिष्ठ महाविद्यालय, परळी वैजनाथ' येथून सेवानिवृत्तीच्या टप्प्यावर विसावत आहे. मात्र, ही निवृत्ती केवळ एका पदाची आहे, त्यांच्या विचारांची आणि सामाजिक बांधिलकीची नव्हे. एक शिक्षक जेव्हा निवृत्त होतो, तेव्हा तो केवळ वर्गातून बाहेर पडत असतो; पण प्रा. रोडे सरांसारखा प्रगल्भ शिक्षक समाजाच्या विशाल वर्गात कायमचा प्रतिष्ठित होतो.



**प्रज्ञावंत आणि बहुआयामी व्यक्तिमत्व:**

प्रा. विलास रोडे सरांची शैक्षणिक पात्रता पाहिली की त्यांच्यातील निरंतर शिकणाऱ्या विद्यार्थ्याचे दर्शन घडते. इंग्रजी साहित्यात 'एम.ए.' करून त्यांनी जागतिक भाषेवर प्रभुत्व मिळवले, ज्यामुळे त्यांना जागतिक साहित्यातील मानवी संवेदनांचे आकलन झाले. तर राज्यशास्त्रातील 'एम.ए.' मुळे त्यांना देशाची लोकशाही आणि संविधानात्मक मूल्यांची सखोल जाण आली. राज्यघटनेने दिलेले अधिकार आणि कर्तव्ये यांची सांगड त्यांनी आपल्या जीवनात घातली. मात्र, त्यांच्या जीवनाचा खरा कणा ठरले ते 'एम.ए. (फुले-आंबेडकर विचारधारा)'. या तिसऱ्या पदवीने त्यांना केवळ ज्ञान दिले नाही, तर जगण्याची दृष्टी दिली. ही विचारधारा त्यांच्या नसानसात भिनली आहे. इंग्रजीचे प्राध्यापक असूनही त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात असलेली कमालीची विनम्रता याच विचारधारेची फलश्रुती आहे.

**मिलिंद कनिष्ठ महाविद्यालयातील 'विद्यार्थिप्रिय' कारकीर्द:**

परळीच्या शैक्षणिक वर्तुळात 'प्रा. विलास रोडे सर' हे नाव आदराने घेतले जाते. मिलिंद कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन करताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती घालवली. ग्रामीण भागातील मुलांसाठी इंग्रजी हा विषय वाघिणीचे दूध असला तरी तो पचायला कठीण वाटतो, पण सरांनी तो अतिशय सुलभ केला. ते केवळ व्याकरण शिकवणारे शिक्षक नव्हे, तर 'जागतिक तत्वज्ञाना' पासून ते 'आंबेडकरी साहित्या'पर्यंतचे दाखले देत विद्यार्थ्यांचे वैचारिक प्रबोधन करणारे मार्गदर्शक आहेत. साहित्यातील जीवनमूल्ये त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली. विद्यार्थ्यांशी असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळेच ते खऱ्या अर्थाने 'विद्यार्थिप्रिय' ठरले. निवृत्तीच्या वेळी त्यांच्या डोळ्यांतील समाधान हे त्यांनी घडवलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या यशाचे प्रतिबिंब आहे. आज त्यांचे विद्यार्थी देशभर पसरले आहेत, पण सरांनी दिलेली माणुसकीची शिकवण त्यांच्या पाठीशी कायम आहे.

**बौद्ध धम्म आणि आंबेडकरी चळवळीतील सक्रिय योगदान:**

प्रा. रोडे यांच्या जीवनाचे सर्वात महत्त्वाचे अंग म्हणजे त्यांची 'धम्मनिष्ठा'. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिक्षण, संघटन आणि संघर्ष' हा संदेश केवळ भिंतीवर लिहिला नाही, तर तो जगला. धम्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर तो नीतिमत्ता आणि सदाचाराचा मार्ग आहे हे त्यांनी ओळखले.दर रविवारी स्वतःच्या विश्रांतीचा त्याग करून बौद्ध विहारात जाऊन लहान मुलांवर धम्मसंस्कार करणे, त्यांना महापुरुषांच्या विचारांची ओळख करून देणे आणि महिला व नागरिकांसाठी प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करणे, यात त्यांचे मोठे योगदान आहे. भावी पिढी सुसंस्कृत व्हावी, ही त्यांची यामागची निस्वार्थी धारणा आहे.



परळी येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श जयंती सुकाणू समितीत त्यांचा सक्रिय सहभाग असतो. जयंती केवळ साजरी न करता ती वैचारिक आणि शिस्तबद्ध पद्धतीने कशी व्हावी, याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. उत्सवांना वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

**वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी:**

एकीकडे धम्म संस्कारांची जपणूक करताना दुसरीकडे त्यांनी 'अंनिस' (अंधश्रद्धा निर्मूलन समिती) च्या माध्यमातून समाजातील अज्ञान आणि अनिष्ट रूढींविरुद्ध लढा दिला. विवेकवाद आणि विज्ञानवाद यांची त्यांनी सांगड घातली. विज्ञानाची कास धरून विवेकी समाज निर्माण व्हावा, ही त्यांची तळमळ कौतुकास्पद आहे. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा तिन्ही आघाड्यांवर त्यांनी आपली मोहोर उमटवली आहे. केवळ उपदेश न करता प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समाजाला दिशा दिली. समाजातील वंचितांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करणे, हा त्यांच्या दिनचर्याचा भाग राहिला आहे. अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द आणि पीडितांप्रती असलेली करुणा ही त्यांच्या कार्याची दोन मुख्य सूत्रे आहेत.

**आदर्श कौटुंबिक वारसा:**

एक यशस्वी व्यक्ती तेव्हाच घडते जेव्हा त्याला कुटुंबाची खंबीर साथ लाभते. प्रा. रोडे सरांच्या प्रगतीत त्यांच्या सहचारिणीचे (पत्नीचे) योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्याच खंबीर साथीमुळे सरांना सामाजिक कार्यासाठी वेळ देता आला. घराची जबाबदारी समर्थपणे सांभाळत त्यांनी सरांच्या सामाजिक चळवळीला बळ दिले. या दांपत्याने आपल्या मुलांवर जे संस्कार केले, त्याचे फळ म्हणजे आज त्यांची तिन्ही मुले उच्चविद्याविभूषित आहेत. त्यांची दोन मुले अभियांत्रिकी क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकवत आहेत, तर त्यांची मुलगी डॉक्टर होऊन रुग्णसेवा करत आहे.

अशा प्रकारे स्वतःच्या संसाराची नेटकी घडी बसवत असतानाच त्यांनी समाजाचा संसारही सुधारण्याचा प्रयत्न अविरतपणे सुरु आहे. 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे त्यांनी स्वतःचा परिवार आदर्श बनवून समाजासमोर एक उत्तम उदाहरण ठेवले आहे.

**नव्या प्रवासाची नांदी:**

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रा. विलास रोडे सर शासकीय सेवेतून निवृत्त होत आहेत. पण ज्यांच्या रक्तामध्ये 'चळवळ' आहे, तो माणूस कधीच निवृत्त होत नाही. त्यांच्यासाठी निवृत्ती म्हणजे विसावा नसून 'पूर्णवेळ' समाजकार्याची दिलेली एक सनद आहे. त्यांच्या वाट्याला आता पूर्णवेळ समाजसेवा आणि धम्मप्रचाराची संधी येणार आहे. परळीतील आदर्श व्यक्तिमत्त्व, विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक आणि आंबेडकरी चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते यापुढेही आपल्या विचारांनी समाजाला दिशा देत राहतील, यात शंका नाही.ज्ञान, प्रज्ञा आणि संस्कारांचे धम्ममेरू प्रा. विलास रोडे सरांना त्यांच्या पुढील निरामय, आरोग्यदायी आणि कार्यतत्पर आयुष्यासाठी कोटी कोटी मंगलकामना!

**प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे संवाद:9822836675**

# महिला महाविद्यालयात मराठीभाषा गौरवदिन सोहळा उत्साहात साजरा
## मराठी भाषेत राज्यकारभार व्हावा यासाठी शिवरायांनी राज्य व्यवहारकोष निर्माण केला

**परळी वार्ताहर**

येथील कै . लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील मराठी विभागात मराठीभाषा गौरवदिन सोहळा उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष - प्रा प्रसाद देशमुख होते .तर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त वि . वा . शिरवाडकर (कुसुमाग्रज ) यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .

संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा . प्रसादजी देशमुख यांनी आपल्या वक्तव्यात कुसुमाग्रजांच्या मराठी साहित्य सेवेसोबत त्यांच्या अनेक प्रेरक कार्यांची माहिती दिली . मराठीभाषा ही व्यवहारात - प्रायोगिकतेत असावी . असे सांगून छत्रपती शिवरायांनी मराठीची सेवा करण्यासाठी मराठी राज्य व्यवहारकोष तयार केला असे सांगितले .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा डॉ श्याम नेरकर यांनी केले .त्यांत त्यांनी मराठीभाषा गौरव दिनाचे महत्व सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्वच अध्यापक व अध्यापकेतर सहकारी व विद्यार्थिनी समूह मोठ्या प्रमाणात उपस्थित होता .



# पिंपळनेरमध्ये कांद्याच्या पिकात अफूची शेती उघड; 10.58 लाखांचा मुद्देमाल जप्त

**पिंपळनेर- बातमीपत्र**

२७ फेब्रुवारी २०२६ – पिंपळनेर शिवारात कांदा आणि लसूण पिकाच्या आड अफूची बेकायदेशीर लागवड करणाऱ्या शेतकऱ्यावर पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ४२ किलो ३५५ ग्रॅम वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून त्याची अंदाजे बाजार किंमत १० लाख ५८ हजार ८७५ रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### खात्रीशीर माहितीवरून छापा–

दि. २७ फेब्रुवारी रोजी पिंपळनेर पोलिसांना विशाल भगवान इतापे (वय २९, रा. पिंपळनेर) हा आपल्या शेतात अफूची बेकायदेशीर लागवड करत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली व महसूल विभागाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दुपारी ३ वाजता संबंधित शेतावर छापा टाकण्यात आला.

### कांद्याच्या पिकात लपवून लागवड

छाप्यादरम्यान शेतातील कांदा व लसूण पिकाच्या मध्यभागी लपवून लावलेली अफूची हिरवीगार झाडे आढळून आली. पोलिसांनी तत्काळ ती झाडे उपटून जप्त केली. जप्त मालाचे वजन ४२ किलो ३५५ ग्रॅम इतके भरले.

NDPS कायद्यांतर्गत गुन्हा : आरोपी विशाल इतापे याच्याविरुद्ध NDPS Act, 1985 अंतर्गत कलम ८(क) व १५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मा. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सपोनि श्री. घुगे, पोउपनि गोलवाल, शिंदे, ग्रेड पोउपनि आत्माराम गर्जे तसेच पोलीस कर्मचारी वनवे, घुमरे, पठाण, ढाकणे, तावरे व चालक पवार यांच्या पथकाने ही धाडसी कारवाई केली. महसूल विभागाचे ग्राम महसूल अधिकारी प्रशांत ढोले व कृषी सहाय्यक शिंदे यांनीही पंचनाम्यात सहभाग घेतला. पिंपळनेर परिसरात झालेल्या या कारवाईमुळे बेकायदेशीर अमली पदार्थ शेती करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा कारवाया यापुढेही सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.



# पाऊस, वारा अशा प्रतिकूल परिस्थितीतही ओंकार विक्रमीच !

## पांगरीच्या ओंकार कारखान्याकडून एका दिवसात तब्बल 5404 मे. टन विक्रमी गाळप





### चेअरमन बाबुराव बोत्रे पाटी यांनी केले अभिनंदन

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

इतर कारखाने उसा अभावी गाळप बंद करीत असताना पांगरीच्या ओंकार शुगर युनिट क्रमांक 8 ने पाऊस- वारा अशा प्रतिकूल परिस्थितीतही चांगले गाळप करीत आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे. एका दिवसामध्ये तब्बल 5404 मेट्रिक टन उसाचे विक्रमी गाळप करून यशाचा चढता आलेख कायम ठेवला. याबद्दल ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी पांगरी येथील ओंकार साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर, अधिकारी, कर्मचारी व ऊसउत्पादक शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

ऊस गाळप हंगामाचा आता शेवटचा टप्पा सुरू असून अनेक कारखान्यांना उसाची कमतरता भासत आहे. त्यामुळे बरेच कारखाने 'नो-केन' झाल्याचे दिसत आहेत. असे असले तरी पांगरी येथील ओंकार साखर कारखाना युनिट क्रमांक 8 मात्र यशस्वी गाळप करताना दिसत आहे. दोन - चार दिवसांमध्ये जोरदार पाऊस आणि वारा असल्याने वाहने उसाच्या फडामध्ये जाण्यास अडचणी येत आहेत. अशी प्रतिकूल परिस्थिती असुनही ओंकारला उसाची कमतरता भासत नाही. या कारखान्याने गेल्या 24 तासांमध्ये तब्बल 5,246 मॅट्रिक टन उसाचे विक्रमी गाळप केले आहे. ही गाळपाची गती पुढेही कायम ठेवण्याचा कारखाना व्यवस्थापनाचा प्रयत्न असल्याचे जनरल मॅनेजर यांनी सांगितले.

परिसरामध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे यामुळे ऊस मोठ्या प्रमाणावर आडवा झाला असून शेतामध्ये वाहने जाण्यासही अडचणी निर्माण होत आहेत अशा प्रतिकूल परिस्थितीही पांगरी येथील ओंकार साखर कारखाना युनिट क्रमांक 8 च्या व्यवस्थापनाने गाळपाचे गती वाढवली आहे. कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर यंत्रणा लावली असून शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त ऊस गाळपास आणण्याचा प्रयत्न आहे.

### चांगल्या भावाने वाढविला विश्वास

ओमकार कारखान्याने परिसरातील साखर कारखान्यापेक्षा अतिशय चांगला भाव दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा ओढा याच कारखान्याला ऊस देण्याकडे असल्याचे दिसून येत आहे. ऊस उत्पादक शेतकरी या वाढीवभावामुळे समाधानी झाला असून ओंकार वर त्यांचा विश्वास वाढल्याचे चित्र दिसत आहे.

### चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्याकडून अभिनंदन

पांगरी येथील ओमकार साखर कारखाना युनिट क्रमांक आठणे एका दिवसात तब्बल 5404 मॅट्रिक टन उसाचे गाळप करून नवा विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी स्थानिक कारखान्याचे जनरल मॅनेजर, अधिकारी, कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# मुकुंदराज शिवजयंती उत्सव समिती तर्फे श्रीमती पार्वतीबाई सोपानराव मुंडे यांना आदर्श माता पुरस्कार प्रदान

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मुकुंदराज शिवजयंती उत्सव समिती, अंबाजोगाई यांच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या आदर्श माता–पिता पुरस्कार सोहळ्यात यंदाचा आदर्श माता पुरस्कार कनेरवाडी येथील कै. सोपानराव मुंडे यांच्या पत्नी श्रीमती पार्वतीबाई सोपानराव मुंडे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अंबाजोगाई येथील नगरपरिषद सभागृहात आयोजित या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते. माजी मंत्री पंडितरावजी दौंड साहेब, नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर पापा मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे तसेच आयोजक ॲड. प्रशांत पवार आदींच्या हस्ते श्रीमती मुंडे यांचा सन्मान करण्यात आला.

श्रीमती पार्वतीबाई मुंडे यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण व संस्कारांची भक्कम पायाभरणी करून समाजात आदर्श निर्माण केला आहे. त्यांचे सुपुत्र मा. विश्वास सोपानराव मुंडे (इन्कमटॅक्स आयुक्त, पुणे), सौ. दीपाताई विश्वासराव मुंडे (समाज कल्याण आयुक्त, पुणे), प्राचार्य भास्करराव सोपानराव मुंडे, मा. आनंद सोपानराव मुंडे (न्यायाधीश), डॉ. कल्याण सोपानराव मुंडे (जे.जे. हॉस्पिटल) तसेच सौ. सुनंदा नारायण फड हे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत.

या सन्मानामुळे श्रीमती पार्वतीबाई मुंडे यांच्या कार्याचा गौरव झाला असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.




# मोठ्या राजकीय घडामोडीनंतर महागाव नगरपंचायतीत भाजपचा झेंडा; 12 विरुद्ध 5 मतांनी रंजना आडे नगराध्यक्षपदी विराजमान

■ महागांव प्रतिनिधी

स्थानिक राजकारणात मोठी उलथापालथ घडवत महागाव नगरपंचायत येथे नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत सिद्ध करत सत्ता हस्तगत केली. काँग्रेसच्या ताब्यात असलेली नगराध्यक्षपदाची धुरा आता भाजपकडे आली असून भाजपच्या नगरसेविका रंजना आडे यांची १२ विरुद्ध ५ मतांनी नगराध्यक्षपदी निवड झाली. काँग्रेसच्या उमेदवार रुपाली कोहलेकर यांना केवळ ५ मते मिळाली.

यापूर्वी काँग्रेसच्या सुनंदा कोपरकर या नगराध्यक्षपदी कार्यरत होत्या. मात्र काही नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटत गेला आणि अखेर अविश्वास ठराव दाखल होऊन सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाली. विश्वास ठरावापासून ते अध्यक्ष निवडीपर्यंतच्या राजकीय हालचालींमध्ये काँग्रेसचे चार तसेच शिवसेना (उद्धव ठाकरे गट)चा एक नगरसेवक भाजपच्या बाजूने ठाम उभा राहिल्याने सत्तेची गणिते पालटली.

प्रभारी मुख्य अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या निवडणुकीत भाजपने संख्याबळाच्या जोरावर विजय निश्चित केला. उपनगराध्यक्षपदी शिवसेना (उद्धव ठाकरे गट)चे शाखा उर्फ प्रमोद भरवाडे यांची निवड झाली. त्यामुळे स्थानिक पातळीवर नवे राजकीय समीकरण आकारास आल्याची चर्चा रंगू लागली आहे.



दरम्यान, जयश्री नरवाडे यांचे नाव चर्चेत असतानाही पक्षाने शेवटच्या क्षणी रंजना आडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. या निर्णयामुळे अंतर्गत राजकारणालाही वेग आला असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

नगरपंचायतीच्या कार्यकाळास अवघे काही महिने शिल्लक असताना भाजपसमोर विकासकामांची गती वाढविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. उर्वरित कालावधीत ठोस कामगिरी झाली नाही, तर आगामी थेट जनतेतून होणाऱ्या नगराध्यक्ष निवडणुकीत त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

एकूणच, १२ विरुद्ध ५ अशा स्पष्ट मताधिक्याने झालेल्या या निवडीमुळे महागावच्या राजकारणात भाजपचे वर्चस्व अधोरेखित झाले असून काँग्रेससमोर नव्याने संघटनबांधणीचे आव्हान उभे ठाकले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल निर्णायक मानला जात आहे.

# महिला महाविद्यालयाची उपजिल्हा रुग्णालयास अभ्यास भेट

■ परळी , वार्ताहर

येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय हे विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असते . त्यांचा विकास व्हावा म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास सहलीचे आयोजन या महाविद्यालयातील विविध विभाग करीत असतात .

त्याचाच एक भाग म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे मॅ यांच्या मार्गर्शनात गृहविज्ञान विभागाच्या विद्यार्थिनीची दि २७ फेब्रु २०२६ रोजी परळी येथील उपजिल्हा रुग्णालयास भेट सहल आयोजित करण्यात आली . शैक्षणिक ज्ञाना बरोबरच विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास हा महाविद्यालयाचा प्रमुख उद्देश असतो. उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गुट्टे सर यांनी या उपजिल्हा रुग्णालयाच्या कार्य पद्धतीची व विविध विभागांची विस्तृत माहिती दिली .या वेळी विभागप्रमुख डॉ. रागिणी पाध्ये , गायकवाड मॅडम प्रा .आचार्य मॅडम यांच्यासह विद्यार्थिनी वर्ग मोठ्याप्रमाणावर उपस्थित होता . गृहविज्ञान विभागाच्या या उपक्रमाचे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भरभरून कौतुक केले .



# अंभोरा पोलिस वाहन तपासणीच्या नावाखाली करतात आर्थिक लुट; वाहन धारकांशी हुज्जत घालत केली जाते दमदाटी!

## 'त्या' धस 'मुसळे'पणा करणाऱ्या कर्मचाऱ्याची एसपी कडे तक्रार

■ आष्टी प्रतिनिधीः

अंभोरा पोलिस कायम वादाच्या भोवऱ्यात असतात. एकिकडे गुन्हे दाखल होत असताना त्या गुन्हाची उकल होत नाही.तर दुसरीकडे चोरी,घरफोडीसह गंभीर गुन्हाचे प्रमाण वाढले आहे.यात लक्ष घालून निर्गती करण्यात रस वाटत नसल्याने वाहन तापसणीच्या नावाखाली वाहन धारकांशी हुज्जत घालत आर्थिक लुट केली जात असल्याचे समोर आले असुन हा कारभार धस 'मुसळे' पणाचा सुरू आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी कायम वेगवेगळ्या चर्चेत असतात.गुन्हे उकल होत नसल्याने अनेकांना उपोषणास बसावे लागले तरी गुन्हे निर्गती झाली नाही.अल्पवयीन मुलीचे अपहरण, चोरी,घरफोडी,गंभीर घटना दिवसेंदिवस वाढत असल्याचे समोर येत आहे.यात लक्ष घालून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठीचे प्रयत्न ठाणेदाराकडून फोल ठरत आहेत.तर दुसरीकडे बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील वाघळुज येथील चेकपोस्टवर वाहन तपासणी केली जाते.या मोहिमेचे स्वागत आहे.पण दुसरीकडे कर्तव्यावर असलेले पोलिस वाहन धारकांशी उध्दट वर्तन करतात,दमदाटी करतात.तर काही लोकांकडून आर्थिक रसद देखील घेतली जाते.हे सर्व कोणच्या आशिर्वादाने चालले जाते असा प्रश्न उपस्थित होत आहे.



### म्हणे आम्ही नाचायला उभा आहोत का ?

वाहन धारकांची तपासणी करत असताना पोलीस अर्वाच्य भाषेत बोलत आहेत.एवढेच नव्हे तर वाहन धारकांनी विनवनी केल्यास तुम्ही काहीच सांगू नका आम्ही काय इथे नाचायला उभा आहोत का ?असे उध्दटपणे बोलले जात आहे.

### सरपंच परिषदेच्या प्रदेशाध्यक्षांची एसपीकडे तक्रार

अंभोरा पोलिस ठाण्यातील पोलीस अंमलदार तुषार मुसळे या कर्मचाऱ्यांचे वर्तन उध्दट आणि बेजबाबदार असल्याने जबाबदार पदाधिकाऱ्या सोबत देखील एकेरी उल्लेख केला जात असल्याने मस्तावलेल्या या कर्मचाऱ्यांची व त्यांना पाठीशी घालणाऱ्या ठाणेदारांची सरपंच परिषेदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी एसपी कडे तक्रार केली असून ते काय